यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : www.ycmou.ac.in • https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_prtrndc@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230191
प्रा. राम ताकवले संशोधन केंद्र / Prof. Ram Takwale Research Centre

# प्रा.राम ताकवले स्मृतिगाथा प्रकाशन व व्याख्यान

## इतिवृत्त

**ठिकाण : Academic Hall, शैक्षणिक इमारत**
**दिनांक : दि. १३ मे २०२४** **वेळ : दुपारी ०३:०० ते ०४:३०**

विद्यापीठाला गतिमान करणारे हुरहुन्नरी तेजस्वी व्यक्तिमत्व कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सरांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू पदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून त्यांच्या मार्गदर्शनाअंतर्गत विद्यापीठात नवनवीन कार्य जोमाने सुरु आहे. दि. ०१ ऑगस्ट २०२३ रोजी या विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू प्रा. राम ताकवले यांच्या नावाने प्रा. राम ताकवले संशोधन केंद्राची स्थापना करून या केंद्राच्या माध्यमातून संशोधन व विकसन कार्यास गती दिली. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू प्रा. राम ताकवले यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्य प्रा. राम ताकवले यांचे कार्य, त्यांच्या सोबतच्या आठवणी यांना उजाळा देऊन त्या चिरकालठेवण्यासाठी प्रा. राम ताकवले स्मृतिगाथा प्रकाशन व व्याख्यान कार्यक्रम दि. १३ मे २०२४ रोजी दुपारी ०३:०० ते ०४:३०दरम्यान संपन्न झाला.

या कार्यक्रमास मा.कुलगुरू प्रो. संजीव सोनवणे मा.प्र.कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन,वरिष्ठ प्राध्यापक व व्यवस्थापन मंडळाचे सदस्य प्रा.जयदीप निकम, प्रा. राम ताकवले संशोधन केंद्राच्या संचालिका इमरटस प्रोफेसर कविता साळुंके, कुलसचिव श्री. दिलीप भरड, प्रमुख पाहुणे म्हणून श्री. विवेक सावंत मुख्य मार्गदर्शक एम के सी एल. पुणे, अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन केंद्र संचालक डॉ. हेमंत राजगुरू,नियोजन अधिकारी डॉ. राम ठाकर, वित्तअधिकारी मा. गोविंद कतलाकुटे. परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील, आपल्या विद्यापीठाचे पी आर ओ. श्री. महेंद्र बनसोडे, तसेच सर्व विद्याशाखा / विभाग/ केंद्र यांचे संचालक, विभागीय केंद्र संचालक, प्राध्यापक वृंद, प्रशासकिय अधिकारी व स्टाफ,शैक्षणिक समन्वयकअशी एकूण ८१ जणांची उपस्थिती होती.

उपस्थितांचे शब्दसुमनांनी स्वागत करून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू प्रा. राम ताकवले यांनी आदरणीय कुसुमाग्रज यांच्याकडून लिहून घेतलेले अर्थपूर्ण व विद्यापीठ धोरणाला सुसंगत असणारे विद्यापीठ गीत झाले. यानंतर प्रा. राम ताकवले संशोधन केंद्राच्या संचालिका प्रोफेसर कविता साळुंके यांनी प्रास्ताविक केले. त्यात त्यांनी या स्मृतीगाथा ग्रंथ निर्मिती साठी मा. कुलगुरू

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC/4989
दि. 27/ 5 /2024

यांचे मार्गदर्शन, महाराष्ट्रच नव्हे तर भारताच्या विविध भागातील महनीय लेखकांनी वेळेत केलेले लेखन, प्रकाशन प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व सहकाऱ्यांनी केलेले प्रयत्न, तसेच प्रा. राम ताकवले यांच्या सोबतच्या आठवणींना उजाळा दिला.

त्यानंतर डॉ. विद्यादेवी बागुल यांनी प्रमुख पाहुणे व व्याख्याते श्री. विवेक सावंत यांचा परिचय करून दिला. प्रमुख पाहुण्यांना मा. कुलगुरूंच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह व यशवंतराव चव्हाण यांचे पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर प्रा. राम ताकवले स्मृतिगाथेच प्रकाशन प्रा. राम ताकवले यांचे आवडते विद्यार्थी, मित्र, स्नेही अशा सर्व भूमिका निभावणारे श्री. विवेक सावंत मुख्य मार्गदर्शक एम के सी एल. पुणे व मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यात मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, मा. प्र. कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव श्री दिलीप भरड, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य प्रा. जयदीप निकम व प्रा. राम ताकवले संशोधन केंद्राच्या संचालिका इमरटस प्रोफेसर कविता साळुंके, प्रा. विजयकुमार पाईकराव, डॉ. सचिन पोरे, श्री. विलास बधान ग्रंथ निर्मिती प्रमुख यांचा समावेश होता.

प्रा. राम ताकवले स्मृतिगाथा प्रकाशनानंतर श्री विवेक सावंतमुख्य मार्गदर्शक एम के सी एल. पुणे यांचे व्याख्यान झाले. व्याख्यानातील महत्वपूर्ण आशय व मुद्दे पुढीलप्रमाणे :

- आरवायके महाविद्यालय नाशिक येथील बी.एस्सी. च्या राम ताकवले सरांसमवेत च्या आठवणी.
- पदवी व पदव्युत्तर स्तरासाठी प्रा. राम ताकवले यांनी विकसित केलेली आदर्श प्रश्न पेढी.
- 1976 ला प्रा. राम ताकवले यांनी ब्रिटीश ओपन युनिव्हर्सिटी ला भेट देऊन मुक्त व दुरस्थ शिक्षण पद्धतीचा अभ्यास करून भारतामध्ये मुक्त व दूरस्थ शिक्षण पद्धती कार्यान्वित करण्यासाठी केलेले प्रयत्न.
- पुणे विद्यापीठात physics विषयाचे विद्यार्थी प्रिय अध्यापक म्हणून कार्य.
- पुणे विद्यापीठाचे सर्वात तरुण कुलगुरू म्हणून उल्लेखनीय कार्य.
- विद्यार्थी विकास हेच प्रा. राम ताकवले सर यांचे मुळ धोरण होते.
- विषमताहीन समाज निर्माण करताना परिस्थितीनुरूप शिक्षण, समस्यापूर्ती शिक्षण, भूमिका प्रधान शिक्षण दिले.
- बंदिस्त शिक्षणापासून मुक्त करून आत्मविश्वास निर्माण करणारे शिक्षण.
- डॉ. जे.पी.नाईक, विनोबा भावे यांचा प्रा. राम ताकवले यांच्यावरील प्रभाव.
- १९८९ मध्ये स्थापन झालेल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू म्हणून उल्लेखनीय कार्य.
- महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात मुक्त विद्यापीठाची विशेष ओळख प्राप्त करून देण्यात प्रा. राम ताकवले यांचे महत्वपूर्ण योगदान.
- वंचितापर्यंत ज्ञानगंगा पोहोचविण्यावर प्रा. ताकवले यांचा विशेष भर.
- भविष्यवेधी कुलगुरू.
- कामातुन ज्ञानप्राप्ती, ज्ञानातून समाजाचा विकास ही विचारधारा .

- स्वावलंबी व स्वायत्त शिक्षणाची व्यवस्था यावर त्यांचा भर.
- इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून देशपातळीवर विशेष उल्लेखनीय कार्य.
- खाजगी जीवनातील त्यांची सरलता .
- NAACचे अध्यक्ष म्हणून कार्य.
- प्रा. राम ताकवले सर वयाच्या ६५ नंतर संगणक शिकले
- Deschooling Society, नई तालीम यांचा शिक्षणात प्रयोग.

इ. संदर्भात श्री विवेक सावंतमुख्य मार्गदर्शक एम के सी एल. पुणे यांनी प्रा. ताकवले सरांसमवेतच्या आठवणी, प्रसंग सांगून आपले व्याख्यान दिले.

विद्यापीठाला गतिमान करणारे मा. कुलगुरू प्रा.संजीव सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना प्रा. राम ताकवले सर व प्रा.कोळस्कर सर यांच्या मुळे आपली जडण घडण होऊन आपण कुलगुरू पदापर्यंत पोहोचलो ह्याचा आवर्जून उल्लेख करून प्रा. राम ताकवले यांच्या समवेतच्या आठवणी सांगितल्या. प्रा. राम ताकवले हे भविष्यवेधी व प्रेरणादायी कुलगुरू होते. असे सांगून त्यांनी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, मा कुलगुरू, मा. प्र कुलगुरू, कुलसचिव, वित्त अधिकारी, प्रा. राम ताकवले संशोधन केंद्राच्या संचालक व उपस्थित सर्व संचालक, प्राध्यापक, अधिकारी, शैक्षणिक संयोजक उपस्थित सर्व मान्यवर व या कार्यक्रमास मदत करणारे सर्व ज्ञात अज्ञात व्यक्तींचे आभार श्री. विजयकुमार पाईकराव सहयोगी प्राध्यापक यांनी मानले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. व अध्यक्षांच्या वतीने कार्यक्रम संपला असे जाहीर करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. रामताकवलेसंशोधनकेंद्रातील शैक्षणिक संयोजक डॉ. सचिन अशोक पोरे यांनी केले.

सोबत :- 1) कार्यक्रमाचे फोटो
2) पार्टीसीपंटस लिस्ट

**डॉ. सचिन अशोक पोरे**
शैक्षणिक संयोजक
प्रा. राम ताकवले संशोधन केंद्र

**इमरटस प्रोफेसर कविता साळुंके**
संचालक, स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग आणि
प्रा. राम ताकवले संशोधन केंद्र

मा. कुलगुरु 17/5/24

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_sol@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230191
ऑनलाईन शिक्षण विद्याशाखा / School of Online Learning

SOOL/2024/ 279

Date: 06/05/2024

# परिपत्रक

विद्यापीठातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, सोमवार दि. १३ मे २०२४ रोजी आपल्या विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू प्रो. राम ताकवले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्यावर तयार केलेल्या स्मृतिग्रंथाचा प्रकाशन सोहळा कार्यक्रम प्रो. राम ताकवले संशोधन केंद्रामार्फत आयोजित करण्यात आला आहे. सदर प्रकाशन एम.के. सी.एल. चे चीफ मेंटोर श्री. विवेक सावंत यांच्या हस्ते मा. कुलगुरूंच्या उपस्थितीत संपन्न होईल. सर्वांनी सदर कार्यक्रमास दि. १३ मे २०२४ रोजी दुपारी ०२:३० वा. शैक्षणिक इमारत ऑडीटोरीयम हॉलमध्ये उपस्थित राहावे.

कार्यक्रमाचे स्वरूप पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | कार्यक्रम | ठिकाण | वेळ |
|---|---|---|---|
| १. | चहापान | शैक्षणिक इमारत ऑडीटोरीयम हॉलच्या बाहेर | ०२:३० ते ०३:०० |
| २. | प्रो. राम ताकवले स्मृतीगाथा प्रकाशन सोहळा | शैक्षणिक इमारत ऑडीटोरीयम हॉल | ०३:०० ते ०३:१५ |
| ३. | श्री. विवेक सावंत यांचे व्याख्यान | शैक्षणिक इमारत ऑडीटोरीयम हॉल | ०३:१५ ते ०४:०० |
| ४. | अध्यक्षीय समारोप | शैक्षणिक इमारत ऑडीटोरीयम हॉल | ०४:०० ते ०४:३० |

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ज्ञानगंगा घरोघरी नाशिक-४२२ २२२

(दिलीप भरड)
कुलसचिव

**प्रत माहितीसाठी :**

- मा. कुलगुरू कार्यालय
- मा. प्र. कुलगुरू कार्यालय

**प्रत उचित कार्यवाहीसाठी :**

- सर्व विभाग / केंद्र / कक्ष / विद्याशाखा संचालक यांना विनंती की, हे परिपत्रक आपल्या अधिनस्थ शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सहकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
- प्रमुख जनसंपर्क कक्ष – सदर कार्यक्रमाची बातमी प्रसिद्ध करावी.
- प्रमुख दृकश्राव्य निर्मिती केंद्र – सदर कार्यक्रमाचे ऑडीओ/व्हिडीओ रेकॉर्डिंग करावे तसेच कार्यक्रमापूर्वी विद्यापीठ गीत व कार्यक्रमाचे शेवटी राष्ट्रीय गीत वाजविणे.
- श्री. राजेश बर्वे – सदर कार्यक्रमाचे फोटो काढावे.
- प्रमुख, पी.पी.सी. – प्रो. राम ताकवले यांच्या स्मृतीग्रंथाच्या प्रती प्रकाशनासाठी उपलब्ध करून द्याव्यात.
- प्रो. राम ताकवले संशोधन केंद्र – कार्यक्रमाचे आयोजन व चहापान व्यवस्था.

## प्रोफेसर राम ताकवले संशोधन केंद्र

ज्ञानगंगा घरोघरी

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## प्रो. राम ताकवले स्मृतिगाथा प्रकाशन





**सन्माननीय पाहुणे**

**मा.श्री.विवेक सावंत**
**मुख्य मार्गदर्शक, एम.के.सी.एल.पुणे**

**कार्यक्रमाचा तपशील**

**दि. १३ मे २०२४**

भारतीय सौर वैशाख २३ शके १९४६

**वेळ**

दुपारी ०३:०० ते ०४:३०

(चहापान ०२:३० ते ०३:००)

**स्थळ**

ऑडीटोरीयम हॉल,
शैक्षणिक इमारत
य.च.म. मुक्त विद्यापीठ,
नाशिक.

### उपस्थितांचे स्वागत

डॉ. सचिन पोरे, शैक्षणिक संयोजक, प्रो. राम ताकवले संशोधन केंद्र

### पाहुणे परिचय

डॉ. विद्यादेवी बागुल, शैक्षणिक संयोजक, स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग

### प्रास्ताविक

इमरटस प्रोफेसर कविता साळुंके
संचालक, प्रो. राम ताकवले संशोधन केंद्र

### प्रो. राम ताकवले स्मृतिगाथा प्रकाशन व व्याख्यान

मा. श्री. विवेक सावंत
मुख्य मार्गदर्शक, एम.के.सी.एल. पुणे

### अध्यक्षीय समारोप

प्रोफेसर संजीव सोनवणे
मा. कुलगुरू, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक.

### आभार

प्रा. विजयकुमार पाईकराव, सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

कार्यक्रमास अवश्य उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

### आपले विनीत

| इमरटस प्रो. कविता साळुंके<br>संचालक,<br>प्रो. राम ताकवले संशोधन केंद्र | डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन<br>प्र. कुलगुरू | श्री. दिलीप भरड<br>कुलसचिव |
|---|---|---|

## सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक वृत्त...

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रा. राम ताकवले यांच्या स्मृतिनिमित्त स्मृतिग्रंथाचे प्रकाशन



# कापडणेतील कुस्ती स्पर्धेत पुण्याच्या बाळू बाळकेने जिंकली मानाची गदा



YCMOU (PRO) Date 15 May 2024
Aapla Mahanagar

आपलं महानगर My महानगर.com

# मुक्त विद्यापीठात प्रा. राम ताकवलेंच्या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन



**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू प्रा. राम ताकवले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन एमकेसीएलचे विवेक सावंत यांच्या हस्ते व विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी मुक्त विद्यापीठाच्या प्रा. राम ताकवले संशोधन केंद्रामार्फत विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीच्या शैक्षणिक सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य तथा संचालक डॉ. जयदीप निकम, कुलसचिव श्री. दिलीप भरड, इमरटस प्राध्यापक कविता साळुंके, प्रा. विजयकुमार पाईकराव उपस्थित होते.

विवेक सावंत म्हणाले की, माझ्या सहकाऱ्यांना नेहमी सांगायचो की, ताकवले सरांसोबत काम करताना तुमचे विचार १० वर्ष पुढे आहे असा विचार करून काम करा. प्रा. ताकवले सर हे भविष्यवेधी विचारवंत होते. त्यांच्या विचारात स्पष्टता असायची. शिक्षण हे भविष्य निर्माण करण्यासाठी आहे, असे ते नेहमी म्हणायचे. ताकवले सरांचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांनी शिक्षण, कृषी, उद्योग, विज्ञान, माहिती व तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रात काम करण्याची त्यांनी संधी मिळाली. विद्यापीठाच्या संस्थापक कुलगुरूंनी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी अविरत प्रयत्न केले, अशा आपल्या पूर्वसुरींविषयी कृतज्ञता कशी व्यक्त करावी त्याचा वस्तुपाठ कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी उभा केला, याबद्दल त्यांनी कुलगुरू आणि मुक्त विद्यापीठाचे कौतुक केले.

कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की, प्रा. ताकवले यांना प्रत्येक वेळी भेटल्यावर त्यांचेकडे नवीन विचार असायचे. ते काळाच्या पुढे चालणारे व्यक्तीमत्व होते. त्यांच्याबरोबर काम केल्यामुळे माझ्या व्यक्तीमत्वात बदल झाला. ताकवले सरांचे विचार जाणून घेणे, त्याप्रमाणे कार्यप्रवण होणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली, असे त्यांनी सांगितले.

पाहुण्यांचा परिचय डॉ. विद्यादेवी बागूल यांनी करुन दिला. कार्यक्रमास शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवर, विद्यापीठाच्या सर्व विद्याशाखांचे संचालक शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, शैक्षणिक संयोजक उपस्थित होते. डॉ. सचिन पोरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. राम ताकवले संशोधन केंद्राच्या संचालक प्रा. कविता साळुंके यांनी प्रास्ताविक केले. प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी आभार मानले.

YCMOU (PRO) Date 14 May 2024 Deshdoot

देशदूत

नाशिक । मंगळवार, दि. १४ मे २०२४

# डॉ.ताकवले यांच्या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन

नाशिक । यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे संस्थापक



कुलगुरू प्रा. राम ताकवले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन व व्याख्यान मुक्त विद्यापीठाच्या प्रा. राम ताकवले संशोधन केंद्रामार्फत विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीच्या शैक्षणिक सभागृहात आयोजित करण्यात आले. प्रकाशन एमकेसीएल मुख्य मार्गदर्शक, विवेक सावंत यांच्या हस्ते व कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य तथा संचालक डॉ. जयदीप निकम, कुलसचिव दिलीप भरड, इमरटस प्राध्यापक कविता साळुंके, प्रा. विजयकुमार पाईकराव उपस्थित होते. स्मृतिग्रंथात प्रा. ताकवले यांच्यासोबत काम केलेले विविध मान्यवर, तिन्ही विद्यापीठांतील त्यांच्यासोबत काम केलेले सहकारी यांच्या प्रा. ताकवले सरांसोबतच्या आठवणी नमूद करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने प्रा. राम ताकवले यांचे एक शिक्षक म्हणून एकवटलेले विविध गुण ग्रंथात मांडण्यात आलेले आहे. प्रास्ताविक कविता साळुंके यांनी केले. परिचय डॉ. विद्यादेवी बागुल यांनी करून दिला. सुत्रसंचालन डॉ. सचिन पोरे यांनी केले.

YCMOU (PRO) Date 14 May 2024

Sakal

सकाळ TODAY नाशिक, मंगळवार, १४ मे २०२४

# प्रा. राम ताकवले यांच्या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन




**नाशिक :** दिवंगत प्रा. राम ताकवले यांच्यावरील स्मृतिग्रंथाचे प्रकाशन करताना उपस्थित मान्यवर.

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १३ : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू प्रा. राम ताकवले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन झाले. याबरोबरच विद्यापीठाच्या प्रा. राम ताकवले संशोधन केंद्रामार्फत शैक्षणिक सभागृहात आयोजित व्याख्यानात विवेक सावंत यांनी मार्गदर्शन केले.

मुक्त विद्यापीठ येथे आयोजित कार्यक्रमात स्मृतिग्रंथाचे प्रकाशन एमकेसीएलचे मुख्य मार्गदर्शक विवेक सावंत यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य तथा संचालक डॉ. जयदीप निकम, कुलसचिव दिलीप भरड, इमरटस प्रोफेसर कविता साळुंके, प्रा. विजयकुमार पाईकराव उपस्थित होते.

या स्मृतिग्रंथात प्रा. ताकवले यांच्यासोबत काम केलेले विविध मान्यवर, तीनही विद्यापीठातील त्यांच्यासोबत काम केलेले सहकारी यांच्या प्रा. ताकवले सरांसोबतच्या आठवणी नमूद केल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या दृष्टीने प्रा. राम ताकवले यांचे शिक्षक म्हणून एकवटलेले विविध गुण या ग्रंथात मांडले आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राम ताकवले संशोधन केंद्राच्या संचालक इमरटस प्रोफेसर कविता साळुंके यांनी केले.

श्री.सावंत म्हणाले, की ताकवले सर भविष्यवेधी विचारवंत होते. त्यांच्या विचारात स्पष्टता असायची. शिक्षण हे भविष्य निर्माण करण्यासाठी आहे, असे ते नेहमी म्हणायचे. विद्यार्थी विकास हेच त्यांचे मुळधोरण होते. कुलगुरू डॉ. सोनवणे म्हणाले, की त्यांना प्रत्येक वेळी भेटल्यावर त्यांच्याकडे नविन विचार असायचे. ते काळाच्या पुढे चालणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्यासोबत काम केल्यामुळे माझ्या व्यक्तिमत्त्वात बदल झाला, असेही त्यांनी नमूद केले. परिचय डॉ. विद्यादेवी बागूल यांनी करून दिला. डॉ. सचिन पोरे यांनी सूत्रसंचालन केले. आभार प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी मानले.